# नाशिक महानगरपालिका,नाशिक
## महिला व बालकल्याण विभाग
## जाहिरात क्र.१

नाशिक महानगरपालिका नाशिक , महिला व बालकल्याण विभागाच्या ऐच्छिक कार्यक्रमांतर्गत नाशिक मनपाचे ६ विभागातील मनपा संचलित कार्यरत अंगणवाडीतील बालकांना तीन वर्षासाठी पुढीलप्रमाणे सकस पुरक पोषण आहार प्रति दिन प्रती लाभार्थी र .रु.६/- या मंजुर दराने पुरवठा करण्याकरीता खालीलप्रमाणे अर्हता धारण करणा-या महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचत गट यांचेकडून विहीत नमुन्यात विभागनिहाय अर्ज मागविण्यात येत आहेत.

३ ते ६ वयोगटातील मुलांसाठी आहार दर खालीलप्रमाणे राहतील.

| अ. क्र. | लाभार्थी प्रकार | प्रती दिन प्रती लाभार्थी आहार दर | पुरक पोषण आहाराचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | ३ ते ६ वर्षापर्यंतची मनपा अंगणवाडीतील बालके | दर रक्कम रु.६/- (सदरच्या दरात सकस आहार घटक, फळे, इंधन, मेहनताना वाहन खर्च इ.समावेश आहे.) | गरम ताजा आहार तसेच फळे व शेंगदाणा व राजगिरा लाडू (अंगणवाडीत खाऊ घालणे.) किंवा कच्चे धान्य पुरविणे. |

अंगणवाडया पुर्ववत सुरु झाल्यानंतर खालीलप्रमाणे अन्न घटकानुसार सकस आहाराचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

तक्ता अ

| वार | पदार्थ | वजन(ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने (ग्रॅम) |
|---|---|---|---|---|
| सोमवार | गुळ,शेंगदाणे लाडू | ६० | ३६० | ८.८ |
| मंगळवार | केळी | १०० | ११६ | १.२ |
| बुधवार | मटकी,मोडाचीउसळ (शिजवलेली) | ५० | (अंदाजित प्रमाणे (Kcal/१००g) २२० ते २४० | (अंदाजित प्रमाणे) ६ ते ७% |
| गुरुवार | गव्हाची लापशी | ६० | (अंदाजित प्रमाणे) (Kcal/१००g) २५० ते २७० | (अंदाजित प्रमाणे) ३ ते ४% |
| शुक्रवार | केळी | १०० | ११६ | १.२ |
| शनिवार | राजगिरा लाडू | ५० | ७१ | १.४ |

किंवा

कोव्हीड प्रादुर्भावाच्या कालावधीत अंगणवाडया बंद असल्यास बालकांना पुरविण्यात येणारा पुरक पोषण आहार (कच्चे धान्य)

तक्ता ब

| अ.क्र. | पुरक पोषण आहाराचा प्रकार | प्रति बालक प्रति दिन पुरक पोषण आहाराचे प्रमाण |
|---|---|---|
| १. | गहु/तांदुळ | ३८ ग्रॅम |
| २. | मुगदाळ/ मसुर दाळ | २० ग्रॅम |
| ३. | चना/चवळी | ३० ग्रॅम |
| ४. | साखर | २० ग्रॅम |
| ५. | मिरची पावडर | ०४ग्रॅम |
| ६. | हळद पावडर | ०४ ग्रॅम |
| ७ | मीठ | ०८ ग्रॅम |

वरील प्रमाणाचे आहाराबाबत मनपाची सकस आहार नियंत्रण समिती जी पाककृती ठरवेल त्याप्रमाणे आहार पुरवठा करावा लागेल . अर्ज करणाऱ्या महिला मंडळ /महिला संस्था /महिला बचतगटांना खालीलप्रमाणे अटी व शर्ती लागू राहतील.

१) अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचत गट स्थानिक असावेत. तसेच सार्वजनिक विश्वस्त कायदा-१९५० संस्था नोंदणी अधिनियम १८६० महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० किंवा कंपनी अधिनियम १९५६ यापैकी कोणत्याही अधिनियमाखा ली नोंदणी झाली असावी . तसेच बचतगटांचे बाबतीत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना ठराव अन्वये मान्यता ,उपनिबंधक सहकारी सोसा.,महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी नोंदणी केलेले नोंदणी बाबतचे वैध पत्र/प्रमाणपत्र,बचतगटातील सदस्यांची यादी जोडणे आवश्यक राहील.

२) एका महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचत गटास एकाच विभागात अर्ज करता येईल.

३) महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचतगट यांचे नावे बँक खाते , बँक पासबुक, पॅनकार्ड, वैध अन्न परवाना नोंदणी क्रमांक (फुड लायसन्स) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन इ. असणे आवश्यक आहे.

४) अर्जदार महिला मंडळ /महिला संस्था/महिला बचत गटांना अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत किमान एक वर्ष पुर्ण कालावधीचा शासकीय /महानगरपालिका योजनेत आहार पुरवठा करण्याचा अनुभव असणा-या महिला मंडळ /महिला संस्था/महिला बचत गटांना प्राधान्य देण्यात येईल . सोबत अनुभवाचा दाखला सादर करणे बंधनकारक आहे.

५) नाशिक मनपातील सर्व किंवा विभागनिहाय असणाऱ्या अंगणवाडयांना आहार पुरवठा करणेबाबत सादर केलेल्या अर्जावर कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा नाकारणेचा सर्व अधिकार मा . आयुक्त नामनपा यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

६) सदरील महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचत गट यांना काळया यादीत टाकलेले नसावे.

७) तसेच सदरील कामाचे Sub Contract अनुज्ञेय असणार नाही.

८) आहार पुरवठयाबाबत महिला मंडळ /महिला संस्था/महिला बचत गटांनी सादर करावयाचा अर्जाचा नमुना महिला व बालकल्याण विभाग , मुख्यालय,राजीव गांधी भवन , नाशिक येथे कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत दि. २१ / १२ /२०२१ ते दि. १० /०१/२०२२ या कालावधीत विनामुल्य मिळेल. तसेच सदर अर्जाचा नमुना मनपाचे संकेतस्थळ www.nmc.gov.in येथे देखील उपलब्ध आहे.

९) अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत दि. ११ /०१ /२०२२ रोजी दुपारी १.०० पावेतो राहील. मुदतीनंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाही.

१०) महिला मंडळ /महिला संस्था /महिला बचत गटांमार्फत तयार पुरक पोषण सकस आहार पुरवठा करण्यासाठी सविस्तर अटी व शर्ती अर्जासोबत देणेत येतील.

Sd/-
आयुक्त
नाशिक महानगरपालिका नाशिक

नाशिक महानगरपालिका नाशिक

महिला व बालकल्याण विभाग

## प्रपत्र अ

अंगणवाडी सकस पुरक पोषण आहाराचा तीन वर्षासाठी पुरवठा करण्यासाठी अटी शर्ती

नाशिक मनपा क्षेत्रातील मनपा अंगणवाडीतील बालकांना महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचत गट यांचेमार्फत नाशिक महानगरपालिकेच्या अंगणवाडयांना तीन वर्षासाठी सकस आहार पुरवठा करण्याचे काम मंजूर करण्यासंदर्भात अटी व शर्ती -

१) महिला मंडळ म्हणजे महिला संस्था असू न सदर संस्थेचे सर्व संचालक /विश्वस्त/सदस्य हे महिला असणे आवश्यक असून तिची सार्वजनिक विश्वस्त कायदा -१९५० संस्था नोंदणी अधिनियम १८६० महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० किंवा कंपनी अधिनियम १९५६ यापैकी कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणी झालेली असावी. नोंदणी प्रमाणपत्र घटना व सभासद यादी जोडावी . महिला बचत गटांचे बाबतीत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना ठराव अन्वये मान्यता ,उपनिबंधक सहकारी सोसायटी ,सरकारी बँकाअंतर्गत नोंदणी झालेले महिला बचतगट महिला आर्थिक विकास महामंडळ यांनी नोंदणी केलेले नोंदणीबाबतचे पत्र/प्रमाणपत्र, बचतगटांतील सदस्यांची यादी जोडणी आवश्यक राहील.

२) अर्जदार महिला मंडळ /महिला संस्था /महिला बचतगटांचे बँकेत खाते असलेले पासबुक ,बचतगटातील सदस्यांची यादी इत्यादी कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

३) .अर्ज करणाऱ्या महिला मंडळ /महिला संस्था/महिला बचतगटाचे स्वतंत्र किचन असणे आवश्यक आहे . तेथे स्वच्छता,पाणी पुरवठा , हवेशीर वातावरण ,आवश्यक भांडी , गॅस कनेक्शन व अग्निप्रतिबंधक उपाययोजना असणे आवश्यक आहे.

४) अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचतगट स्थानिक मनपा कार्यक्षेत्रातील असावेत.

५) अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचतगटांकडे अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत किमान एक (१) वर्ष पूर्ण कालावधीचा शासकीय/महानगरपालिका योजनेत आहार पुरवठा करण्याचा अनुभव असणा-या अशा महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचतगटांना प्राधान्य देण्यात येईल. सोबत अनुभवाचा दाखला सादर करणे बंधनकारक आहे.

६) मा.अतिरिक्त आयुक्त (शहर) नामनपा यांचे मार्फत अंतिम विभागनिहाय पात्र ठरविलेल्या अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था /महिला बचतगटांना आहार पुरवठयासाठी समितीस योग्य वाटेल त्याप्रमाणात अंगणवाडयांचे वाटप करण्यात येईल.

७) अर्जदार महिला मंडळ /महिला संस्था /महिला बचतगट यांची किमान ३ महिने आहार पुरवठा करण्याची क्षमता असावी . अर्ज सादर करतेवेळी रु .१०,०००/- बँक बॅलेन्स असणे आवश्यक आहे . अर्जासोबत बँकेचे पासबुकची साक्षांकित केलेली प्रत जोडणे आवश्यक राहील.

८) ३ ते ६ वयोगटातील मुलांसाठी आहार प्रमाण व दर खालीलप्रमाणे राहतील.

| अ. क्र. | लाभार्थी प्रकार | प्रती दिन प्रती लाभार्थी आहार दर रु. | पुरक पोषण आहाराचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | ३ ते ६ वर्षापर्यंतची मनपा अंगणवाडीतील बालके | र.रु.६/-<br>(सदरच्या दरात सकस आहार घटक, फळे, इंधन, मेहनताना वाहन खर्च इ.समावेश आहे.) | गरम ताजा आहार तसेच फळे व लाडू (अंगणवाडीत खाऊ घालणे.) किंवा कच्चे धान्य पुरविणे. |

अंगणवाडया पुर्ववत सुरु झाल्यानंतर खालीलप्रमाणे अन्न घटकानुसार सकस आहाराचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

तक्ता अ

| वार | पदार्थ | वजन (ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने (ग्रॅम) |
|---|---|---|---|---|
| सोमवार | गुळ,शेंगदाणे लाडू | ६० | ३६० | ८.८ |
| मंगळवार | केळी | १०० | ११६) | १.२ |
| बुधवार | मटकी,मोडाचीउसळ(शिजवलेली) | ५० | (अंदाजित प्रमाणे (Kcal/१०० g) २२० ते २४० | (अंदाजित प्रमाणे) ६ ते ७% |
| गुरुवार | गव्हाची लापशी | ६० | (अंदाजित प्रमाणे) (Kcal/१०० g) २५० ते २७० | (अंदाजित प्रमाणे) ३ ते ४% |
| शुक्रवार | केळी | १०० | ११६ | १.२ |
| शनिवार | राजगिरा लाडू | ५० | ७१ | १.४ |

सकस आहार वितरणाबाबतचा पाककृती व आठवडयाचा आराखडा आहार तक्ता.

| वार | पदार्थ | त्या दिवसाचे काम |
|---|---|---|
| सोमवार | गुळ,शेंगदाणे लाडू | १) आदल्या दिवशी शेंगदाणे निवडणे व साफ करणे.<br>२) शेंगदाणे व ग्गुळ चांगल्या प्रतीचा असावा.<br>३) लाडू वळणे व बांधणे. ४) शेंगदाणे गुळाचा लाडू वाटप करणे. |
| मंगळवार | केळी | १) केळी चांगल्या प्रतीची असावीत.<br>२) केळी जास्त कच्ची तसेच जास्त पिकलेली नसावी. |
| बुधवार | मटकी मोडाची ऊसळ (शिजवलेली) | १) आदल्या दिवशी मटकी निवडून साफ करुन भिजत घालणे.<br>२) चवीनुसार मीठ टाकून उसळ शिजवणे. ३) उसळ वाटप करणे. |
| गुरुवार | गव्हाची लापशी | १) तुकडा गहू चांगल्या प्रतीचे व निवडून घ्यावे.<br>२) चवीनुसार गुळ वापरावा.३) चवदार गव्हाची लापशी बनवून वाटप करणे. |
| शुक्रवार | केळी | १) केळी चांगल्या प्रतीची असावीत.<br>२) केळी जास्त कच्ची तसेच जास्त पिकलेली नसावी. |
| शनिवार | राजगिरा लाडू | १) चांगल्या प्रतीचा राजगिरा व गुळ वापरुन जास्त कडक नसलेला तसेच चवदार लाडू वाटप करावा. |

किंवा

कोव्हीड प्रादुर्भावाच्या कालावधीत अंगणवाडया बंद असल्यास बालकांना पुरविण्यात येणारा पुरक पोषण आहार (कच्चे धान्य)

तक्ता ब

| अ.क्र. | पुरक पोषण आहाराचा प्रकार | प्रति बालक प्रति दिन पुरक पोषण आहाराचे प्रमाण |
|---|---|---|
| १. | गहु/तांदुळ | ३८ ग्रॅम |
| २. | मुगदाळ/ मसुर दाळ | २० ग्रॅम |
| ३. | चना/चवळी | ३० ग्रॅम |
| ४. | साखर | २० ग्रॅम |
| ५. | मिरची पावडर | ०४ग्रॅम |
| ६. | हळद पावडर | ०४ ग्रॅम |
| ७ | मीठ | ०८ ग्रॅम |

९) मा.शासन निर्णय क्रमांक एबावि २००८/प्रक्र-५९/का५/दि.२४ ऑगष्ट २००९ मधील मुद्दा क्र.३.१० मध्ये नमुद केल्यानुसार अंगणवाडीत देण्यात येणाऱ्या आहारातील उष्मांक व प्रथिने इ.घटक तपासण्यासाठी वेळोवेळी येणारा प्रयोगशाळेचा (Analysis Report) खर्च महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचतगट यांनी स्वत: करावयाचा आहे. किमान दर तीन महिन्यातून एकदा उक्त तपासणी करणे अनिवार्य राहील . तसेच दंडात्मक कार्यवाहीबाबत मुद्दा क्र .३.१० व ३.११ नुसार करण्यात येईल.

१०) सद्यस्थितीत कोरोना विषाणुच्या पार्श्वभुमीवर नामनपाच्या अंगणवाडया मा . शासन निर्देशानुसार बंद आहेत . मा. शासन निर्देशानुसार अंगणवाडया सुरु करण्यास परवानगी मिळाल्यानंतर तक्ता अ मधील सकस आहार पुरविणे. व अंगणवाडया सुरु न झाल्यास तक्ता ब मधील सकस आहार पुरविणे करीता मा.महासभा ठराव क्र.३१ दि. दि.३०/७/२०१२ अन्वये मंजुर दराने प्रती लाभार्थी प्रती दिन र.रु.६/- याप्रमाणे तक्ता अ व तक्ता ब मधील सकस आहार पुरवावा लागेल.

११) मा.अतिरिक्त आयुक्त (शहर) नामनपा निवड समितीने निश्चित केलेल्या पाककृतीप्रमाणे व ठरवून दिलेल्या प्रती लाभार्थी प्रती दिन रु .६/- अनुज्ञेय दराने तसेच सुधारीत प्रमाणकानुसार तक्ता अ किंवा तक्ता ब मधील आहार पुरवठा करण्यास तयार असून त्याबाबत महिला मंडळ/महिला संस्था /महिला बचतगट बांधील आहो त असे कार्यकारी दंडाधिकारी यांच्या सहीशिक्यानिशी रु .१००/- चे स्टॅपपेपरवर हमीपत्र दयावे लागेल . निवड समितीने ठरवून दिलेल्या पाककृतीमधील सर्व घटक पोषण आहारामध्ये असणे आवश्यक राहील.

१२) महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचतगट यांची स्वत:ची वाहतूक व्यवस्था असणे आवश्यक असून अंगणवाडी केंद्रावर वेळेवर आहार पुरवठा करणे व अंगणवाडीतील उपस्थित सर्व बालकांना सकस आहार वाटप करण्याची जबाबदारी राहील.

१३) अन्नामध्ये कुठल्याही प्रकारचे भेसळ आढळून आल्यास /जिवितास धोकादायक पदार्थ असल्यास अन्न सुरक्षा व मानदे कायदा-२००६ नियम व नियमावली २०११ अन्वये कायद्यांतर्गत महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचतगट हे कार्यवाहीस पात्र राहतील.

१४) महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचतगट यांचे स्वयंपाकगृह आयुक्त व त्यांनी प्राधिकृत केलेले अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी भेट देवून तपासणी करु शकतील.

१५) महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचतगट यांचेकडे पॅनकार्ड व वैध अन्न नोंदणी क्रमांक/अन्न परवाना, जी.एस.टी.रजिस्ट्रेशन आवश्यक असून अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील. यशस्वी/पात्र महिला मंडळ/महिला संस्थेस/महिला बचत गटास बील बुक (टॅक्स इनव्हाईस) तयार करुन घेणे बंधनकारक राहील.

१६) मा.आयुक्त यांचेकडून सदर योजनेसंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचना मार्गदर्शनानुसार काम करणे बंधनकारक राहील.

अर्जदार महिला मंडळ / महिला संस्था / महिला बचतगट

स्वाक्षरी व नावाचा शिक्का

नाशिक महानगरपालिका नाशिक

महिला व बालकल्याण विभाग

प्रपत्र ब

नाशिक मनपा अंगणवाडी पुरक पोषण आहाराचा तीन वर्षासाठी पुरवठा करण्यासाठी

दि. २१ /१० /२०२१ च्या जाहिरातीनुसार अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| | अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचत गटाचे नाव व पत्ता :- | |
| | ज्या विभागाकरीता अर्ज करावयाचा आहे त्या विभाग कार्यालयाचे नाव :-<br>(पंचवटी/ना.पश्चिम/ना.पूर्व/सिडको/सातपूर/ना.रोड) | |
| | महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचत गट नोंदणीकृत आहे काय ? असल्यास कोणत्या कायदयाने -<br>नोंदणी क्रमांक व दिनांक :-<br>बचतगटाच्या बाबतीत बँकेचे खाते क्रमांक व खाते उघडल्याचा दिनांक :-<br>अर्ज करतेवेळी जमा असलेल्या रकमेचा तपशिल :- | |
| | अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचत गट यांना आहार पुरवठयाचा अनुभवाचा दाखला जोडलेबाबत तपशील. | |
| | उत्पादन केंद्राचा / किचनचा पत्ता :- | |
| | अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचतगट यांचे अन्न नोंदणी क्रमांक व पॅनकार्डचे जी.एस.टी.रजिस्ट्रेशन क्रमांक तपशिल :- | १) अन्न नोंदणी क्रमांक :<br>२) पॅनकार्ड क्रमांक :<br>३) जी.एस.टी.रजिस्ट्रेशन क्रमांक |
| | महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचतगटाचे अध्यक्ष तथा सदस्यांची नावाची यादी. (जे मंडळाचे प्रत्यक्ष कामकाज पाहणार) त्यांचे नाव, पत्ता, दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :- | १) अध्यक्ष :<br>पत्ता :<br>दुरध्वनी क्र.:<br>२) सदस्य :<br>पत्ता :<br>दुरध्वनी क्र.:<br>३) सदस्य :<br>पत्ता :<br>दुरध्वनी क्र.:<br>४) सदस्य :<br>पत्ता :<br>दुरध्वनी क्र.:<br>५) सदस्य :<br>पत्ता :<br>दुरध्वनी क्र.: |

(पुढील पानावर)

| | | |
|---|---|---|
| | अर्जदार महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचत गट यांच्याकडे असणाऱ्या आवश्यक प्रमाणपत्राबाबत सोबत जोडलेल्या परिशिष्ठामध्ये माहिती दयावी.<br><br>(प्रपत्राप्रमाणे कागदपत्रे राजपत्रित अधिकारी तसेच सक्षम अधिकारी यांनी स्वाक्षांकित केलेल्या सत्यप्रती अर्जासोबत जोडावेत.) :- | |
| | हमी पत्र - कार्यकारी दंडाधिकारी यांच्या सही शिक्यानिशी रु.१००/- चे स्टॅपपेपरवर सादर. | |

प्रमाणित करण्यात येते की, अर्जामध्ये नमुद केलेली सर्व माहिती व जोडलेले सर्व कागदपत्रे/ प्रमाणपत्रे सत्य असून त्यामध्ये काही खाडाखोड तथा बनावट आढळून आल्यास महिला मंडळाचे पदाधिकारी फौजदारी दंडसंहितेनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

अर्जदार महिला मंडळ / महिला संस्था / महिला बचतगट
स्वाक्षरी व नावाचा शिक्का

नाशिक महानगरपालिका नाशिक

महिला व बालकल्याण विभाग

प्रपत्र क

अंगणवाडी पुरक पोषण आहाराचा तीन वर्षासाठी पुरवठा करण्यासाठी

महिला मंडळ/महिला संस्था/ महिला बचत गट यांच्याकडे आवश्यक असणाऱ्या प्रमाणपत्राबाबत माहिती सादर करावयाचे विहित प्रपत्र

| | महिला मंडळ/ महिला संस्था/ महिला बचत गटाचे नाव व पत्ता | किचन पत्ता | अन्न व औषध प्रशासन विभाग/ महानगरपालिका यांचेकडील किचन ना हरकत प्रमाणपत्राचा क्र. दिनांक व पॅनकार्ड क्र. | नोंदणी क्रमांक व दिनांक/बचत गटाच्या बाबतीत बँकेचे खाते क्रमांक व बँकेचे नाव | अर्ज करण्याचे तारखेस उपलब्ध बॅलन्स | अंगणवाडीत आहार पुरवठा/ शालेय पोषण आहार योजने अंतर्गत आहार पुरवठा केल्याबाबतचे अनुभवाचा कालावधी व सकस आहार प्रशिक्षणबाबत प्रमाणपत्र असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

स्वाक्षरी

महिला मंडळ/महिला संस्था/ महिला बचत गट

टिप :- महिला मंडळ/महिला संस्था/ महिला बचत गटाचे नोंदणी प्रमाणपत्र, सभासदांची यादी, बचतगटाचे बाबतीत बॅकेंच्या पासबुकची व बँक बॅलन्स प्रमाणपत्राच्या प्रती राजपत्रित/सक्षम अधिकाऱ्याकडून स्वाक्षांकित केलेल्या सोबत जोडाव्यात.

# हमी पत्र

मी खालील सही करणार नाव-

पत्ता-

कारणे सत्य प्रतिज्ञेवर हमीपत्र लिहून देते की, मी वरील पत्यावर कायम स्वरुपी राहत असून महाराष्ट्र राज्याची कायम रहीवाशी आहे. तसेच मी महिला मंडळ / महिला संस्था/महिला बचत गट पत्ता

याची अध्यक्ष असून सदरचा महिला मंडळ / महिला संस्था /महिला बचत गट माध्यमातून म.न.पा.अंगणवाडी विभाग यांना सकस आहार नियंत्रण समितीने निश्चित केलेल्या पाककृतीप्रमाणे म .न.पा.ने ठरवून दिलेल्या प्रती लाभार्थी प्रती दिन रु .६/- अनुज्ञेय दराने तसेच तक्ता अ मधील आहार पुरवठा करणार आहे.

सद्यस्थितीत कोरोना विषाणुच्या पार्श्वभुमीवर नामनपाच्या अंगणवाडया मा . शासन निर्देशानुसार बंद आहेत. मा. शासन निर्देशानुसार अंगणवाडया सुरु करण्यास परवानगी मिळाल्यानंतर तक्ता अ मधील सकस आहार पुरविणे. व अंगणवाडया सुरु न झाल्यास तक्ता ब मधील सकस आहार पुरविणे करीता मंजुर दराने प्रती लाभार्थी प्रती दिन र.रु.६/- याप्रमाणे सकस आहार पुरविण्यास आम्ही महिला मंडळ/महिला संस्था/ महिला बचत गट बांधील आहोत.

अंगणवाडया पुर्ववत सुरु झाल्यानंतर खालीलप्रमाणे अन्न घटकानुसार सकस आहाराचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

तक्ता अ

| वार | पदार्थ | वजन(ग्रॅम) | उष्मांक | प्रथिने (ग्रॅम) |
|---|---|---|---|---|
| सोमवार | गुळ,शेंगदाणे लाडू | ६० | ३६० | ८.८ |
| मंगळवार | केळी | १०० | ११६ | १.२ |
| बुधवार | मटकी,मोडाचीउसळ(शिजवलेली) | ५० | (अंदाजित प्रमाणे (Kcal/१०० g) २२० ते २४० | (अंदाजित प्रमाणे ) ६ ते ७% |
| गुरुवार | गव्हाची लापशी | ६० | (अंदाजित प्रमाणे (Kcal/१०० g) २५० ते २७० | (अंदाजित प्रमाणे ) ३ ते ४% |
| शुक्रवार | केळी | १०० | ११६ | १.२ |
| शनिवार | राजगिरा लाडू | ५० | ७१ | १.४ |

किंवा

कोव्हीड प्रादुर्भावाच्या कालावधीत अंगणवाडया बंद असल्यास बालकांना पुरविण्यात येणारा पुरक पोषण आहार (कच्चे धान्य)

तक्ता ब

| अ.क्र. | पुरक पोषण आहाराचा प्रकार | प्रति बालक प्रति दिन पुरक पोषण आहाराचे प्रमाण |
|---|---|---|
| १. | गहु/तांदुळ | ३८ ग्रॅम |
| २. | मुगदाळ/ मसुर दाळ | २० ग्रॅम |
| ३. | चना/चवळी | ३० ग्रॅम |
| ४. | साखर | २० ग्रॅम |
| ५. | मिरची पावडर | ०४ग्रॅम |
| ६. | हळद पावडर | ०४ ग्रॅम |
| ७ | मीठ | ०८ ग्रॅम |

वरीलप्रमाणे पोषक आहाराचा पुरवठा करणेची संपुर्ण जबाबदारी सदरच्या महिला मंडळ/ महिला संस्था/महिला बचत गटाची असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारे कसूर करणार नाही किंवा सदरचे अन्नामध्ये कोणत्याही प्रकारे भेसळ ,जिवीतास धोकादायक पदार्थ असे आढळल्यास आम्ही अन्न सुरक्षा व मानदे कायदा-२००६ नियम व नियमावली २०११ अन्वये महिला मंडळ / महिला संस्था /महिला बचत गट कार्यवाहीस पात्र राहील.

तसेच सदरचा सकस आहार हा अंगणवाडीवर महिला मंडळ /महिला संस्था/महिला बचत गट स्वत:चे जबाबदारीवर वेळेत पुरवठा करणे व वेळेत अंगणवाडीतील उपस्थित सर्व बालकांना सकस आहार वाटप करण्याची जबाबदारी राहील. येणेप्रमाणेमहिला मंडळ /महिला संस्था /महिला बचत गट यांनी वरीलप्रमाणे सर्व कामे करण्यास कसूर केल्यास होणाऱ्या कायदेशीर कारवाईस पात्र राहील याची जाणीव आहे.

सदरचा संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. खोटा अगर बनावट आढळल्यास त्यास मी जबाबदार राहील.

हे हमीपत्र,
नाशिक.

दिनांक : / / २०२

हमी पत्र लिहून देणार

(महिला मंडळ/महिला संस्था/महिला बचत गट अध्यक्षाचा फोटो व स्वाक्षरी)

(वरील हमीपत्र रु.१००/- चे स्टॅपपेपर टाईप करुन देणे.)